# ई - पोलीस पत्रिका

दि १२/१२/२०२२ अनु.क्र. २२७

## (अमरावती शहर पोलीसांची २०२२ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- “सुरक्षित व सुखकर अमरावती” हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

**भाग-१**

**नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा**

**१.पोआअ/पशा-५/घर भाडे भत्ता/१४५५४/२०२२, अमरावती शहर दि.०७/१२/२०२२**

# आदेश

पोलीस आयुक्त अमरावती शहर या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी व मंत्रालयीन कर्मचारी यांना नियमानुसार भाडेमाफ निवासस्थानाची सोय आहे. त्यांचे शहरामध्ये स्वत:चे घर असल्यामुळे, भाडयाने राहत असल्याने व शासकीय निवासस्थान उपलब्ध/रिक्त नसल्याने शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक घरभाडे भत्ता/१००९/प्र.क्र.६७/सेवा-५,दिनांक २४/०८/२००९, व महाराष्ट्र शासन वित्त विभागाचे शासन निर्णय क्र.घभाभ-२०१९/प्र.क्र.२/सेवा-५, दि.०५.०२.२०१९ व वित्त विभाग शासन निर्णय घभाभ-१०१५/प्र.क्र.१९/सेवा-५ दिनांक १६/१२/२०१६ अन्वये ज्यावेळी सातव्या वेतन आयोगानुसार अनुज्ञेय केलेला महागाई भत्ता हा २५ टक्याची मर्यादा ओलांडल्याने खालील नमुद कर्मचारी यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे त्यांना दिनांक पासुन १८% व पोस्टे नांदगांव पेठ, वंलगाव व भातकुली येथील नेमणुकीस असलेले पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना ९ % घरभाडे भत्ता व मंजुर करण्यात येत आहे.

तसेच शासकीय निवासस्थान उपलब्ध झाल्यावर त्यांचे घरभाडे भत्ता बंद करण्यात येईल या अटीवर खालील पोलीस कर्मचारी यांना घरभाडे भत्ता मंजुर करण्यात येत आहे.

| अक्र | पदनाम/ब.क्र./नाव | नेमणुक | घरभाडे भत्ता टक्केवारी | घरभाडे मंजुर दिनांक |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| १ | परि.पोउपनि/रवी झाकर्डे | कोतवाली | १८% | ०३/०७/२०२२ |
| २ | मपोशि/६६९ विशाखा रामटेके | पो.मुख्यालय | १८% | ०५/०३/२०२२ |
| ३ | पोना/२४९ सिध्देश्वर गुटे | पो.मुख्यालय | १८% | १२/११/२०२२ |
| ४ | पोशि/८२७ निलेश कांडलकर | कोतवाली | १८% | ०१/०१/२०२२ |
| ५ | पोशि/३७२ मंगेश दिघेकर | कोतवाली | १८% | ०१/०१/२०२२ |
| ६ | पोना/९७५ सुभाष पाटील | शवाशा | १८% | ०१/०७/२०२२ |
| ७ | पोशि/६०२ गोपाल वायझाडे | बडनेरा | १८% | २१/०४/२०२२ |
| ८ | चा.पोशि/२००५ अनिकेत वानखडे | मो.प.वि. | १८% | ०२/०६/२०२२ |
| ९ | पोना/७१३ गणेश काठे | पो.मुख्यालय | १८% | १०/११/२०२२ |

**२. पोआअ/आस्था-वेनिलि/आंजिब हजर/वे.नि./१४५६९/२०२२, अमरावती शहर दि.०८/१२/२०२२**

खालील नमुद पोलीस अंमलदार हे नमुद पोलीस घटकातुन या कार्यालयाच्या आस्थापनेवर सपोउपनि/पोहवा/पोना/पोशि या पदावरुन पोलीस शिपाई या पदावर त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकास विनंतीने आंतरजिल्हा बदलीवर हजर झालेले आहेत.

त्याअनुषंगाने त्यांची महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ३६ व ३९ मधील तरतुदीच्या अधिन राहून व शासन अधिसुचना, वित्त विभाग, क्र.वेपुर-२०१९/प्र.क्र./सेवा-९, दि.३०.०१.२०१९ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे सुधारीत वेतनवाढी मंजूर करण्यात येत आहे.

**१. मपोशि/२३५, अंजु अशोक विजयकर , नेमणुक पो.स्टे. वलगाव ,अमरावती शहर.**

| वेतनवाढीचा दिनांक | विद्यमान पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतन | वेतनवाढीचा दिनांक | सुधारीत पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतन |
|---|---|---|---|
| ०१.०७.२०२१ | रु.२५२००/- एस-७<br>**पोलीस शिपाई** | ०१.०७.२०२१ | रु.२५२००/- एस-७<br>**पोलीस शिपाई** |
| -- | -- | ०७.१०.२०२१ | **रु.२५२००/- एस-७<br>पो.अ.वर्धा येथुन पोलीस शिपाई या पदावरून पोलीस शिपाई या पदावर विनंतीवरून आंतरजिल्हा बदलीवर या आस्थापनेवर हजर झाले असल्याने एस-७ मधील वेतन अनुज्ञेय.** |
| -- | -- | ०१.०७.२०२२ | रु.२६०००/- एस-७ |

**२. मपोशि/७८८, शारदा बाबुराव रोकडे , नेमणुक पो.स्टे. वलगाव ,अमरावती शहर.**

| वेतनवाढीचा दिनांक | विद्यमान पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतन | वेतनवाढीचा दिनांक | सुधारीत पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतन |
|---|---|---|---|
| ०१.०७.२०२१ | रु.२७६००/- एस-७<br>**पोलीस शिपाई** | ०१.०७.२०२१ | रु.२७६००/- एस-७<br>**पोलीस शिपाई** |
| -- | -- | ०१.११.२०२१ | **रु.२७६००/- एस-७<br>पो.अ.यवतमाळ येथुन पोलीस शिपाई या पदावरून पोलीस शिपाई या पदावर विनंतीवरून आंतरजिल्हा बदलीवर या आस्थापनेवर हजर झाले असल्याने एस-७ मधील वेतन अनुज्ञेय.** |
| -- | -- | ०१.०७.२०२२ | रु.२८४००/- एस-७ |

**३. पोआअ/विचौ-२/कसुरी/अंतिम आदेश/पोना-१०१७ शिंदे/१४५९८/२०२२ अमरावती शहर दि.०८/१२/२०२२**

**संदर्भ :-** या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/का.दा.नो/पोना-१०१७ शिंदे/१०८४५/२०२२ अमरावती शहर, दिनांक ०८/०८/२०२२

**कसुरदारचे नाव :-** पोना/१०१७ मंगेश शिंदे, नेमणुक पोलीस स्टेशन राजापेठ, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही पोना/१०१७ मंगेश शिंदे, पोलीस स्टेशन राजापेठ, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन तुम्ही या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोआअ/आस्था-४/प्रोफेशनल स्कील अपग्रेडेशन/PSU-I/६८८५/२०२२ अमरावती, दिनांक २६/०६/२०२२ अन्वये दिनांक २७/०६/२०२२ ते दिनांक ०९/०७/२०२२ पर्यत गुन्हे अन्वेषण विद्यालय, नाशिक येथे आयोजित १२ दिवसाचे (दोन आठवडयाचे) प्रशिक्षण Professional Skill Upgradation (PSU-I) चे प्रशिक्षण करीता सेवेची १० वर्ष सेवा पुर्ण झालेल्या पोलीस अंमलदार यांची निवड करण्यात आली होती. दिनांक २७/०६/२०२२ ते दिनांक ०९/०७/२०२२ पर्यत नाशिक येथे होणा-या प्रोफेशनल स्कील अपग्रेडेशन PSU-I प्रशिक्षणाकरीता निवड करण्यात आलेली होती. नमुद पोलीस अंमलदार यांना प्रशिक्षण ठिकाणी दिनांक २६/०६/२०२२ रोजी १८.०० वा. पर्यत पोहचतील अशा बेताने रवाना करण्याबाबत आदेशीत करण्यात आलेले होते. तुमची प्रशिक्षणा करीता निवड झालेली असुन या कार्यालयातुन आदेश निर्गती करण्यात आले असतांना सुध्दा तुम्हास डयुटी मदतगार यांनी सदर प्रशिक्षणाकरीता डयुटी पास घेऊन जाण्यास कळविले असता. तुम्ही मी पोलीस स्टेशनला येत आहे. त्यानुसार डयुटी मदतगार यांनी तुमची प्रशिक्षणाकरीता साना क्र. ३४/२२ चे १३.३८ वा. रवाना केले थोडयाच वेळात तुम्ही पोलीस स्टेशन ला आले मी प्रशिक्षणाला जात नाही. माझा नंबर कसा लावला मी डयुटी पास घेत नाही. माझी तब्येत खराब आहे. असे पोलीस स्टेशन मध्ये येवुन जोरजोरात ओरडुन मला सिक पास पाहिजे. तुम्ही सिकपासबाबतचा अर्ज देऊन सिकवर रवाना झाले. तुम्ही प्रशिक्षण टाळण्याकरीता जाणुनबुजून (हेतुपुरस्पर) वरिष्ठांच्या आदेशाचे पालन न करता सिक रजेवर रवाना झाले. तुम्ही बेशिस्त व बेजबाबदारपणा केलेला असुन तुम्ही शिस्तबध्द पोलीस खात्यात असुन सुध्दा तुम्ही तुमच्या कर्तव्यात गैरवर्तन करुन कर्तव्यात कसुर केलेला आहे.

अशाप्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ पोटनियम (२) (५) चे तरतुदी नुसार देय वार्षीक वेतनवाढ एक (१) वर्षाकरीता (परिणाम न होता) का रोखण्यात येवु नये म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदर नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले आहे. सादर केलेल्या स्पष्टीकरण्याचे अवलोकन

केले असता सादर केलेले स्पष्टीकरण संयुक्ती व समाधानकारक न वाटल्याने तुम्हास कारणे दाखवा प्रस्तावीत नोटीस मध्ये दिलेली शिक्षा कायम ठेवुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

उपरोक्त नमुद कसुरदार यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ पोटनियम (२) मधील (५) चे तरतुदी नुसार **"देय वार्षीक वेतनवाढ एक (१) वर्षाकरीता (परिणाम न होता) रोखण्याची शिक्षा देण्यात येत आहे.** उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यस्थीत होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव गृह विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतित सादर करु शकता.

### ४. पोआअ/विचौ-२/कसुरी/अंतिम आदेश/पोशि-११९१वानखडे/१४६५२/२०२२ अमरावती शहर दि.०८/१२/२०२२

**संदर्भ :-** या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोउपआ/परि.२/का.दा.नो./१२६६/२०२२ अमरावती शहर, दिनांक २६/०८/२०२२

**कसुरदारचे नाव :-** पोकॉ/११९१ धिरज वानखडे, नेमणुक पोलीस स्टेशन सिटी कोतवाली, अमरावती शहर

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही पोकॉ/११९१ धिरज वानखडे, पोलीस स्टेशन सिटी कोतवाली, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन पोलीस स्टेशन सिटी कोतवाली हद्दीतील जय मोबाईल चे मालक विजय अछडा यांना धमकी प्रकरणी त्यांना अंगरक्षक म्हणुन तुम्हास कर्तव्य दिले असतांना मा.पोलीस उपायुक्त, परिमंडळ-२, अमरावती शहर यांनी दिनांक २३/०८/२०२२ रोजी १२.५६ वा. जय मोबाईल, ऑटो गल्ली, राजकमल चौक, अमरावती येथे भेट दिली असता तुम्ही कर्तव्यावर गैरहजर मिळुन आले. तरी तुमची पोलीस स्टेशन सिटी कोतवाली हद्दीतील जय मोबाईलचे मालक विजय अछडा यांचे अंगरक्षक म्हणुन डयुटी असतांना तुम्ही महत्वाच्या कर्तव्यामध्ये कोणतीही पुर्व सुचना न देता कर्तव्यावर गैरहजर मिळुन आले असुन तुम्ही कर्तव्यात निष्काळजीपणा, हलगर्जीपणा व कामचुकारपणा केल्याचे दिसुन आले आहे. तरी तुम्ही तुमच्या कर्तव्यात कसुरी केलेली आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या बेशिस्त, बेजबाबदार व गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार रु. ५००/- दंडाची शिक्षा का करण्यात येवु नये ? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदर कारणे दाखवा

नोटीस तुम्ही दिनांक ०७/०९/२०२२ रोजी स्विकारली असुन त्यावर तुमचे आजपावेतो स्पष्टीकरण सादर केलेले नाही. यावरुन तुम्हास देण्यात आलेली शिक्षा मान्य आहे असे गृहीत धरुन कारणे दाखवा प्रस्तावीत नोटीस मध्ये दिलेली शिक्षा कायम ठेवुन खालील प्रमाणे शिक्षेबाबत अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

वर नमुद कसुरदार यांना उपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार "**रु. ५००/- दंडाची शिक्षा देण्यात येत आहे.** "उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यस्थीत होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतित सादर करु शकता.

**५. पोआअ/विचौ-२/कसुरी/अंतिम आदेश/पोना-१८४ नेहारे/१४६५३/२०२२ अमरावती शहर दि.०८/१२/२०२२**

**संदर्भ :-** या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोउपआ/परि.२/का.दा.नो./१२६४/२०२२ अमरावती शहर दिनांक २६/०८/२०२२

**कसुरदारचे नाव :-** नापोकॉ/१८४ सुर्यकांत नेहारे, नेमणुक पोलीस स्टेशन वलगाव, अमरावती शहर

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही नापोकॉ/१८४ सुर्यकांत नेहारे, पोलीस स्टेशन वलगाव, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन मा.पोलीस उपायुक्त, परिमंडळ-२, अमरावती शहर हे दिनांक २३/०८/२०२२ रोजी १२.३२ वा. पोलीस स्टेशन सिटी कोतवाली येथील लॉकअप चेक केले असता त्यामध्ये एकुण ११ पुरुष आरोपी हवालात मध्ये बंद असल्याचे दिसुन आले. तसेच हवालात गार्ड मधील अंमलदार चेक केले असता तुम्ही हवालात गार्ड डयुटीवर गैरहजर मिळुन आहे. अमरावती शहरातील पोलीस स्टेशन राजापेठ व वलगाव येथे आरोपतीतानी केलेल्या आत्महत्यांच्या दोन घटनांच्या पार्श्वभुमीवर कर्तव्यावर हलगर्जीपणा करणा-या ०६ पोलीस अंमलदार यांना निलंबित केलेले आहे. तरी देखील त्याच्या बोध न घेता व पोलीस कोठडी संरक्षणासाठी नेमलेले तुमच्या वर्तनात गांभीर्य न जाणता तुम्ही कर्तव्यावर गैरहजर राहिले. तुम्ही पोलीस स्टेशन सिटी कोतवाली येथील लॉकअप मध्ये आरोपी गार्ड डयुटी असतांना तुम्ही महत्वाच्या कर्तव्यामध्ये कोणतीही पुर्व सुचना न देता कर्तव्यावर गैरहजर मिळुन आले असुन तुम्ही कर्तव्यात कसुरी केलेली आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या बेशिस्त, बेजबाबदार व गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार रु. ५००/- दंडाची शिक्षा का करण्यात येवु नये ? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले आहे. सादर केलेल्या स्पष्टीकरणाचे अवलोकन करुन तुम्हास पुढील कर्तव्यात कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत बदल करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**अंतिम आदेश**

वर नमुद कसुरदार यांना उपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ चे नियम क्रमांक ३ मधील उप-नियम (२) मधील (ii) चे तरतुदी नुसार **"सक्त ताकीद"** ही शिक्षा देण्यात येत आहे.

**(किशोर शेंडे)**
प्रशासकीय अधिकारी
पोलीस आयुक्त, अमरावती शहर करीता

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस